CNR - MHKO130011292021

शिवाजी यळगुडे वगैरे विरुध्द जयराम उर्फ ज्योतीराम यळगुडे वगैरे

# नियमित दिवाणी कज्जा नं.१८२/२०२१ मधील निशाणी क्र.१८ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादीचे सुरु असलेले बांधकाम निशाणी क्र. ५ चे आदेशापर्यंत थांबविणेबाबत 'जैसे थे' चा आदेश करणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, दावा मिळकतीच्या अभिलेखासदरी असलेल्या चुकीच्या नोंदीचा आधार घेत प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे बांधकाम करीत आहेत. बांधकामाबाबत 'जैसे थे' ची परिस्थीती न ठेवलेस बांधकाम पुर्ण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बांधकाम पुर्ण झालेस प्रस्तुत कामी गुंतागुंत होण्याची शक्यता आहे. सबब, सदरचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले असून अर्जातील संपुर्ण मजकुर त्यांनी नाकारला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, दावा मिळकतीचे वाटप झाले असून त्याप्रमाणे प्रत्येकाची स्वतंत्र वहिवाट चालु आहे असे वादीचे कथन आहे. प्रतिवादी कोणत्या पध्दतीने व किती क्षेत्रात अतिक्रमण करत आहे याबाबत वादीने काही नमुद केलेले नाही. प्रतिवादी हा त्यांच्या हिश्याच्या क्षेत्रात बांधकाम करत आहे. असे नमुद करुन अर्ज नामंजुर करणेची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. उभय बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीच्या कथनानुसार, दावा मिळकतीच्या महसूल अभिलेखासदरी झालेल्या नोंदी चुकीच्या आहेत, तर प्रतिवादीच्या

कथनानुसार, प्रतिवादी हे त्याचे हिश्याचे क्षेत्रात बांधकाम करत आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादीची कैफियत व सविस्तर म्हणणे अभिलेखावरती दाखल झालेले नाही. प्रतिवादीचे विधीज्ञ श्री.कुलकर्णी यांनी युक्तीवादादरम्यान दिनांक २३/१२/२०२१ रोजी कैफियत व म्हणणे दाखल करत असलेचे कथन केले. सबब, एकंदरीत वस्तुस्थितीचा विचार करीता, दावा मिळकतीवरील बांधकाम संदर्भातील पुढील गुंतागुंत टाळणेकरीता खालील आदेश पारित करणे योग्य राहील-

- आदेश -

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुत प्रकरणी त्यांचे निशाणी क्र. ५ चे अर्जास म्हणणे दाखल करेपर्यंत दावा मिळकतीवरील बांधकामाची स्थिती आज तारखेअखेर आहे अशा स्थितीत 'जैसे थे' ठेवणेबाबत प्रतिवादींना आदेशित करण्यात येते.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2021.12.22 17:37:25 +0530

(ए. बी. जवळे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कागल

कागल
दिनांकः- २१/१२/२०२१